# वसई विरार शहर महानगरपालिका

## सामान्य प्रशासन विभाग

## मुख्य कार्यालय, विरार (प.)

दिनांक:- ०८/०४/२०२५

# प्रेसनोट

सर्व नागरिकांना महानगरपालिकेद्वारे देण्यात येणा-या सेवा विहित मुदतीत मिळण्यासाठी, महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अंतर्गत ७१ सेवा वसई विरार शहर महानगरपालिकेद्वारे अधिसूचित करण्यात आलेल्या आहेत.

या ७१ सेवांपैकी ५१ सेवा ऑनलाईन पध्दतीने देण्यात येत असून उर्वरित २० सेवा ऑनलाईन करण्याचे काम सुरु आहे. ऑनलाईन असणा-या ५१ सेवा ऑफलाईन व ऑनलाईन दोन्ही पध्दतीने सुरु होत्या पण शासन निर्देश व कामकाजाच्या गतिशिलतेसाठी या सेवा यापुढे दि.२५/०४/२०२५ पासून केवळ ऑनलाईन पध्दतीनेच देण्यात येतील या सर्व सेवांचा तपशिल वसई विरार महानगरपालिकेच्या https://vvcmc.in या वेबसाईटवर देण्यात आलेला असून आपण महानगरपालिकेच्या https://vvcmc.in वेबसाईट वरुन तसेच आपले सेवा पोर्टलवरुन अर्ज करु शकता तसेच प्रभाग समिती मध्ये उपलब्ध असणा-या आपले सरकार सेवा केंद्रा मार्फत अर्ज तसेच अपिल करणेबाबत सेवा उपलब्ध आहे.

तरी सर्व नागरिकांनी महानगरपालिकेस योग्य ते सहकार्य करावे.

उपायुक्त
सामान्य प्रशासन विभाग
वसई विरार शहर महानगरपालिका